# वसई-विरार शहर महानगरपालिका
## विद्युत विभाग, मुख्यालय, विरार पूर्व
### प्रथम वेळ सविस्तर निविदा सुचना क्र. १ (२०१९-२०)

वसई विरार शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडील खालील उल्लेखित कामाकरीता शासनाचे विद्युत विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदाराकडुन बी - १ नमुन्यात द्विलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०८ /०१/२०२० ते दि. १७ /०१/२०२० पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत रोखीने विकत मिळतील. सदर कामाची इसारा रक्कम आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पूर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि. १८/०१/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत महानगरपालिकेच्या विद्युत विभाग,मुख्यालय,विरार पूर्व येथे देण्यात यावेत. प्राप्त निविदा या शहर अभियंता यांचे दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा समिती समोर शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०१ वा. अथवा इतर सोयीच्या दिवशी प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र. १ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. याकामी अलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथावा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | निविदा फॉर्म फी (१८% GST करासहीत) | कामाची मुदत | निविदा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिकाच्या सुर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत बहाडोली ब्रिज येथे सिग्नल यंत्रणा बसविणे. | २,९९,९१५/- | ३,०००/- | २% डी.डी. ने व २% बिलातुन | रु. ५९०/- | १ महिने (३० दिवस) | बी - १ |

**अटी शर्ती :-**

१) कोरे निविदा फॉर्मची मागणी करते वेळी अर्जासोबत सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या ठेकेदारचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्रक आहे. त्यांनी मुळ कागदापत्रासह स्वत:अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत कोरे निविदा फॉर्म घेवून जाणे आवश्यक आहे.

३) निविदा बाबत अधिक माहितीसाठी विद्युत विभाग, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

४) लिफाफा क्र. १ मध्ये खालीलन कागदपत्रांचा छायांकीत प्रती समावेश असणे आवश्यक आहे.

a) सार्व. बांधकाम विभागाकडील (विद्युत) योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची पत्र. b) GST नोंदणी प्रमाणपत्र. c) इसारा रकमेचा डिमांड ड्राफ्ट.

d) रु. १०० स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र e) रु ५०० स्टँप पेपरवर घोषणापत्र.

सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधीत निविदा धारकास अपात्र ठरविण्यात येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलिचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

Scanned by CamScanner

५) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार सादर करण्या-या निविदा धारकांनी लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित विभाग अभियंता यांचेकडे डि.डि. जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असनार नाही.

६) प्रथम न्युनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत "Additional Performance Security Deposit" चा भरणा केला नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या (L-२) निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

७) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसार रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉमन्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे.

अ) १% ते १०% पर्यंत कमी दराचा देकार - परफॉमन्स सिक्युरिटी १ %

ब) १०% ते १५% पर्यंत कमी दराचा देकार - प्रत्येक टक्क्यास अतिरिक्त १ %

क) १५% पर्यंत कमी दराचा देकार - प्रत्येक टक्क्यास अतिरिक्त १ %

(उदा. १९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ:करण :- १०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५%-१०%= ५%) तसेच (१९%-१५%)=४% करीता (४% x२%=८%) असे एकूण (१%+५%+८%=१४%) )

८) मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो त्याच दिवशी दु ४ वाजून ०१ मी. अथवा दुस-या दिवशी उपस्थित निविदाकार / त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

९) कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा आलेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

१०) इतर सविस्तर अटी-शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

जा.क्र. वविशम/श.अ/३४६७/2020 दिनांक - ०८/०७/2020

दिनांक विरार

शहर अभियंता

वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner